आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

ठळक बातम्या

- मतदार याद्यांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करत श्वेतपत्रिका काढण्याची महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे मागणी

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर जोरात

- न्यूझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यात दुसऱ्या डावात भारताच्या ३ बाद २३१ धावा

आणि

- रत्नागिरी, सिंधुदुर्ग, वाशिममध्ये सुरू असलेल्या पावसामुळं शेतकऱ्यांची पीकं धोक्यात

<><><><><>

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुरू असलेल्या गैरप्रकारांची दखल निवडणूक आयोगानं घ्यावी आणि मतदार याद्यांमधल्या अनियमिततेबद्दल श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली आहे. आघाडीच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी आज मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि त्यांना यासंदर्भात निवेदन दिलं. तसंच विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निवडणूक आयोगालाही या संदर्भात पत्र लिहिलं आहे. पराभवाची भीती वाटत असल्यानं महाविकास आघाडीच्या समर्थकांची नावं मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी अर्ज क्रमांक ७ आणि ८

मध्ये फेरफार केल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं भाजपावर केला आहे.

<><><><><>

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारविरोधात आचारसंहिता भंगाची तक्रार केली आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊन आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारने आपल्या शासकीय संकेतस्थळावर एका दिवसात २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसंच २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या. यामुळे आचारसंहितेचा भंग होत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. आचारसंहिता भंग करणाऱ्या या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असं पत्र दानवे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त तसंच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर केलं आहे.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दीपक साळुंखे आणि भाजपाचे माजी आमदार राजन तेली यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. भाजपाचे नेते सुरेश बनकर यांनीही आज पक्ष प्रवेश केल्याची माहिती मुंबई इथं उद्धव ठाकरे यांनी दिली.

<><><><><>

आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी नगरसेवक नाना बागुल तसंच सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा यांनी आज रिपाई अर्थात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गटात प्रवेश केला. त्याबाबतची घोषणा रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास

आठवले यांनी आज मुंबईत केली. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. माजी नगरसेवक नाना बागुल तसंच नंदलाल वाधवा यांना पुष्पगुच्छ देत आठवले यांनी त्यांचं रिपाईत स्वागत केलं.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसनं आमदार सतीश चव्हाण यांना सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका घेतल्यामुळे आणि पक्षशिस्त मोडल्याबद्दल ही कारवाई केल्याचं प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे सांगितलं आहे.

**<><><><>**

एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा पोटनिवडणूक लढवण्याचा मानस व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथे प्रसार माध्यमांशी बोलत होते. पक्षश्रेष्ठींनी आदेश दिला तर नांदेड इथून निवडणूक लढवणार असल्याचं, सय्यद इम्तियाज यांनी सांगितलं.

**<><><><>**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातल्या चार विधानसभा मतदारसंघात MIM उमेदवार उभे करणार आहे. शहराध्यक्ष फारुक शाब्दी यांनी आज ही घोषणा केली. सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून फारुक शाब्दी हेच उमेदवार असतील, अशी घोषणा पक्षाचे अध्यक्ष खासदार असदउद्दीन ओवेसी यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये केली. पक्षानं गेल्या दोन्ही

विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघातून दुसऱ्या क्रमांकाची मतं घेतली होती.

<><><><><>

राष्ट्रसेवा करण्यासाठी संतांचा आशीर्वाद हवा. नकारात्मक शक्तींपासून राष्ट्राची सुरक्षा होण्याची गरज संतांनी आज व्यक्त केली. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज मुंबईत आज विविध धार्मिक संस्थांच्या विश्वस्तांशी संवाद साधला. विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

मुंबईत टोलमुक्तीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं केलेल्या आंदोलना दरम्यान मनसे कार्यकर्त्यांवर दाखल झालेल्या तक्रारी मागे घेतल्या पाहिजेत अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे. आज ते ठाण्यात वार्ताहरांशी बोलत होते. गेली अनेक वर्ष जी टोलवसुली सुरु होती त्यातून नक्की किती पैसे गोळा झाले याचा कोणताही हिशोब नाही नसल्याचं ते म्हणाले. इतक्या वर्षांच्या आंदोलनाला यश मिळाल्याबद्दल त्यांनी मनसेच्या कार्यकर्त्यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पुण्यात विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची भेट घेतली. निवडणुकीसाठी इच्छुकांचा विचार पक्षानं ऐकून घेतला असून त्यांचं म्हणणं पक्ष श्रेष्ठींपुढे मांडण्यात येईल; पण पक्षाकडून ज्याला उमेदवारी मिळेल त्याचं काम करावं लागेल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

पुणे शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांचा राजीनामा स्वीकारणार नसल्याचं पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज स्पष्ट केलं. राज्यपाल नियुक्त आमदारांच्या यादीत समावेश न झाल्यानं पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी पदाचा राजीनामा देण्याचा इशारा दिला होता.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यात विविध निर्बंध लागू करण्याचे आदेश जिल्हा दंडाधिकारी तसंच निवडणूक निर्णय अधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिले आहेत. आचारसंहिता संपेपर्यंत परवानाधारकांना शस्त्र बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. या काळात धरणं आंदोलन, मोर्चा, निदर्शनं, उपोषण करण्यावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

**<><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या धाराशिव शाखेनं अवैध मद्य निर्मिती, वाहतूक तसंच विक्री विरुद्ध कारवाई करून जिल्ह्यातल्या विविध ठिकाणांवरून 15 लाख रुपये

किमतीचा मुद्देमाल केला आहे. १ ऑक्टोबरपासून जिल्ह्यात विविध ठिकाणी ८८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाटात आज एसटी बस आणि ट्रक यांचा अपघात झाला. या अपघातात आठ प्रवासी जखमी झाले असून तिघांची प्रकृती गंभीर आहे. जामनेरहून सुरतकडे जाणाऱ्या बसमध्ये ५५ प्रवासी होते.

**<><><><><>**

बंगळुरू इथल्या चिन्नास्वामी मैदानावर सुरू असलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेटच्या पहिल्या सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात ३ बाद २३१ धावा केल्या आहेत. न्यूझीलंडकडे सध्या १२५ धावांची आघाडी आहे. कालच्या दिवशी भारताचा डाव ४६ धावांवर आटोपल्यानंतर न्यूझीलंडने ४०२ धावा करत भारतासमोर ३५६ धावांची आघाडी घेतली होती. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताकडून विराट कोहली आणि सरफराज खान यांनी प्रत्येकी ७० धावा तर रोहित शर्माने ५२ धावा करत आजचा डाव सावरला.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात पावसामुळे कापणीला आलेल्या भात आणि नाचणी पिकांचं नुकसान झालं आहे. रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. राजापूर तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून लांजा, संगमेश्वर, रत्नागिरी, खेड, चिपळुण, गुहागर आणि

दापोलीतही जोरदार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे ग्रामीण भागासोबत शहरी भागातही जनजीवन विस्कळीत झालं आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेले चार दिवस सुरू असलेल्या पावसाच्या संततधारेमुळे कापणीला आलेल्या पिकांचं नुकसान झालं असून सुमारे ५० हजार हेक्टरवरचं पीक धोक्यात आलं आहे. पाऊस कायम राहिल्यास भाताची पिकं कुजून शेतकऱ्याचं नुकसान होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, वाशिम जिल्ह्यात गेल्या पंधरा दिवसांचा विश्रांतीनंतर मालेगाव आणि मानोरा तालुक्यातल्या काही गावात जोरदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे सोयाबीन काढणीच्या हंगामात शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पुढचे तीन दिवस पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण किनारपट्टीवर या काळात सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असल्याचा अंदाजही विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**